**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.१ यांचा शपथेवर जादा सरतपास शपथेवर सुरु श्री एन.आर. चिद्रेवार विधीज्ञ यांच्या शपथेवर सुरु ः-**

मी निशाण २५ च्या यादी सोबत मुळ धनादेश सादर केला आहे. दि. ०२.०२.२०२३ ला मला चेक सय्यद बिलाल यांनी घरी आणून दिला. आय.डी.बाय बॅकेचा क्र. ०६००४२ चा चेक रक्कम रुपये तीन लाख रुपये त्यावर आरोपी यांनी सही करुन मला दिला दिला होता. मला तो चेक दाखविला तो तोच आहे. त्याला **नि. २७** देण्यात आला. तो चेक वटण्यासठी माझ्या आय.सी.आय.सी.आय. बॅंके येथील माझ्या खात्यावर भरला तो अंकाउट लॉक म्हणून परत मिळला. त्या प्रमाणे त्यांनी मला पावती दिली. ०३ तारखेला परत आला तो मेमो मला दाखविला. तो तोच असून त्याला **नि. २८** देण्यात आला. मी आरोपीला भेटून बोललो की अंकाउट लॉक आहे. त्यांने मला उडवाउडवीची उत्तरे दिली. मी मग माझ्या वकीलामार्फेत दिनांक १५.०२.२०३ ला त्यांच्या घरच्या पत्त्यावर व दुकानाच्या पत्त्यावर नोटीस पाठविली. मी पोस्टाने नोटीस पाठविली त्याच्या पावत्या केस च्या कामी दाखल केल्या आहेत. मला दोन पावत्या दाखविल्या. त्या त्याच असून तिला **नि. २९ व ३०** देण्यात आला. नोटीसची स्थळप्रत मला दाखविली. ति तीच आहे त्यावर माझी सही आहे. त्यातील माहिती खरी व बरोबर आहे. तिला **नि. ३१** देण्यात आला. मी दिलेली नोटीस १६ तारखेला दुकानावर मिळाली व १७ तारेखला घरी मिळाली असे मला ट्रॅकींग रिपोर्ट नुसार कळाले तो ट्रॅकींग रिपार्ट मी केस कामी दाखल केला आहे. मला तो दाखविला. तो तोच असून त्याला **नि. ३२ व ३३** देण्यात आला.

**साक्षीदार यांचा उलटतपास विधिज्ञ श्री. बी.पी. नवटक्के यांच्यातर्फे शपथेवर सुरू ः-**

माझे शिक्षण बारावी पर्यत झाले आहे. मी पी.ओ.पी. च्या सिलींग मटीरियलचे दुकान आहे. माझे दुकान माझ्या नावर असून माझ्या कडे शॉप अॅक्टचा परवाना आहे. मी आयकरचा परतावा भरतो. गेली दहा ते बारा वर्ष परतावे भरतो. मी २०१८ पासून आयकर परतावे भरतो. मी माझ्या दुकानाचा शॉप अॅक्टचा परवाना दाखल करु शकतो. मी पैसे घेतल्याचा व पैसे दिल्याचा उल्लेख मी आयकर परताव्यात घेत

नाही. मी केलेल्या व्यवहाराचा उल्लेख आयकर मध्ये करतो. मी २०२२ च्या परताव्यात या व्यवहाराचा उल्लेख केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, बिलाल मी पैसे दिले नाहीत म्हणून मी परताव्यात त्यांचा उल्लेख केलेला नाही.

बिलाल माझा मित्र आहे. तो माझा वर्ग मित्र नाही. आठ-दहा वर्षापासून तो माझा मीत्र आहे. पैसे दिले त्या दोन - तीन वर्षापासून तो माझा मित्र होय. देसी बॉईज मेन्स फॅशन हे बिलालच्या नावाचे दुकान असून तो प्रो.प्रायटर असल्याचे कागदपत्रे पाहिले आहे. ऑक्टोंबर २०२२ च्या शेटवच्या आठवडयात त्यांनी माझ्याकडे पैसे मागितले. शेख मुजाहिद मोलासाब आणि आतिक मिरधे खाजा समोर पैसे दिले. मी प्लॉटच्या व्यवहारासाठी ते पैसे ठेवलेले होते. दोन तीन महिण्यापासून ते पैसे माझ्याकडेच होते. मी आरोपीला जे पैसे दिले ते पैसे माझ्या घरात ठेवलेले होते. मी ०५ नोव्हेंबरला आरोपीला पैसे दिले. मी शेख मुजाहिद खाजा मिरधे यांच्या समोर दिले. पैसे मागताना व देताना ते दोघे होते. आम्ही सर्व माझ्या दुकानात बसलेलो त्यावेळी तो विषय झाला. मी आरोपीला रोख पैसे दिले. मी तिन लाख रुपये दिल्याबद्दल आरोपीकडून पावती लिहून घेतली नाही.

मी गुत्तेदारी व प्लॉटींगचा पण व्यवसाय करतो. मी भिशी चालवत नाही. पान दुकान चालवणारे शरीफ भाई यांना ओळखतो मी मोबाईल दुकानदार जावेद यांना पण ओळखतो. अलीम बागवान यांना मी ओळखत नाही. बीलालचा भाउ शकील याला ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, मी भिशी चालवतो व हे सर्व मेबर भिशी मधील आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मला शकील कडून पैसे येणे आहे. हे म्हणणे खरे नाही की, भिशी साठी मी आरोपीच्या पासबुकच्या माहिती साठी कोरा चेक घेतला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या भावाने भिशी उचलली व पुढेचे हप्ते भरले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, शकील यांच्या पैश्याची मागणी मी बिलालकडे केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी भिशी चालवतो.

आरोपीचे स्वतःच्या मालकीचे घर आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीकडे एकापेक्षा जास्त गाडया आहेत. हे म्हणणे बरोबर आहे की, आरोपी चांगला कमावता आहे. दि. ०२.०२.२०२३ रोजी आरोपीने चेक मला दिला होता. आरोपीने चेक अदी

भरलेला होता त्यावर सही करुन फक्त दिला. माझ्या समक्ष आरोपीने चेकवर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगतो त्याप्रमाणे माझ्या दरम्यान व बिलाल दरम्यान कोणताही व्यवहार झाला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, बिलाल मला कायदेशीर देणेदार नाही. हे म्हणणे खरे नाही की, बिलालने कायदेशीर देण्यापोटी धनादेश दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी को-या चेक इतर लोकांच्या मदतीने बिलालची सही घेवून तो चेक वटण्यासाठी लावला. बिलाल सारखे इतर किती लोकांना पैसे दिले हे माझ्या लक्षात नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सावकारीचा व्यवसाय करतो.

उदगीर येथील फौजदारी कोर्टात पाच-सात केस आहेत. त्या सर्व केसेस हया चेकच्या आहेत. आरीफ मिया इसक मिया शेख यांच्या विरुध्द मी चेक ची केस केलेली आहे. अझहर हमीद साब शेख यांच्या विरुध्द मी एस.एस.सी. ८७०/२०२३ ही केस दाखल केली आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, बाकीच्या लोकांना रुपये दोन लाख, तिन लाख रुपये दिलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी लोकांनी दिलेल्या चेक दुरुपयोग करुन केस दाखल करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

पुनः तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.03.11 17:50:48 +0530

दिनांकः- ११.०३.२०२६ न्यायदंडाधिकारी प्र.व.

उदगीर (न्यायालय क्रं. १), उदगीर